# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १५] शुक्रवार, जुलै ३, २००९/आषाढ १२, शके १९३१ [पृष्ठे १०, किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक ३३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**— कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण व विक्री करणे, तसेच त्यांची विक्री किंमत निश्चित करणे याबाबत विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित वा तदानुषंगिक बाबींसाठी अधिनियम .. .. .. .. | १-१० |


दिनांक २ जुलै २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ३ जुलै २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण व विक्री करणे, तसेच त्यांची विक्री किंमत निश्चित करणे याबाबत विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित वा तदानुषंगिक बाबींसाठी अधिनियम.**

१९६६ चा ५४. **ज्याअर्थी,** कापसाच्या बी-बियाण्यांचे विवक्षित प्रकार बी-बियाणे अधिनियम, १९६६ च्या कलम ५ अन्वये अधिसूचित केलेले नाहीत आणि त्यामुळे त्याच्या कलम ७ अन्वये, अशा बी-बियाण्यांच्या कोणत्याही विक्रीचे विनियमन करता येत नाही ;

**आणि ज्याअर्थी,** अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, २००६ द्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या अर्थांतर्गत कापसाचे बी-बियाणे ही अत्यावश्यक वस्तू नाही ; २००६ चा ५४. १९५५ चा १०.

**आणि ज्याअर्थी,** अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ अन्वये काढलेल्या बी-बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ च्या तरतुदी कापूस बी-बियाण्यांच्या संबंधात लागू होत नाहीत ; १९५५ चा १०.

**आणि ज्याअर्थी,** जनुकीय परिवर्तन केलेल्या आणि जनुकीयदृष्ट्या सुधारणा केलेल्या कापूस बी-बियाण्यांना राज्यामध्ये करण्यात येणारा पुरवठा, वितरण व विक्री यांचे विनियमन करण्यासाठी आणि अशा कापूस बी-बियाण्यांच्या राज्यातील विक्रीच्या किमतीचे नियत्रण करण्यासाठी पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मध्ये कोणतीही तरतूद नाही ; १९८६ चा २९.

**आणि ज्याअर्थी,** जनुकीय परिवर्तन केलेल्या कापूस बी-बियाण्यांसहित कापूस बी-बियाण्यांचे व्यापारी गरीब शेतकऱ्यांकडून बेसुमार किंमत वसूल करून त्यांची पिळवणूक करीत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** खरिपाचा हंगाम लवकरच सुरू होणार होता त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने राज्यात, कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण आणि विक्री यांचे विक्रीची किंमत निश्चित करून विनियमन करणे अत्यावश्यक झाले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीची किंमत-निश्चिती यांचे विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ९ मे २००९ रोजी महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अध्यादेश, २००९ प्रख्यापित केला होता ; २००९ चा महा. अध्या. ६.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र बी-बियाणे (पुरवठा, वितरण व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अध्यादेश, २००९ याचे राज्य विधानमंडळाच्याअधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— २००९ चा महा. अध्या. ६.

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ९ मे २००९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. **२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(एक) "पीकविषयक कामगिरी" याचा अर्थ, उत्पादकाने दावा केल्याप्रमाणे असलेली, कामगिरीच्या मूल्यमापनासाठी विचारात घ्यावयाची, कोणत्याही प्रकारच्या कापूस बी-बियाण्यांची विभेद्य अशी पीकविषयक, दर्जाविषयक आणि परिमाणविषयक वैशिष्ट्ये, असा आहे ;

(दोन) "नियंत्रक" याचा अर्थ, शासनाने कलम ३ अन्वये नियुक्त केलेला कापूस बी-बियाणे नियंत्रक, असा आहे ;

(तीन) "कापूस बी-बियाणे" याचा अर्थ, पेरणीसाठी वापरण्यात येणारे कोणत्याही प्रकारचे कापूस बी-बियाणे, असा आहे आणि त्यामध्ये, जनुकीय परिवर्तन केलेल्या आणि जनुकीयदृष्ट्या सुधारणा केलेल्या कापूस बी-बियाण्यांच्या प्रकारांचा समावेश होतो ;

(चार) "शेतकरी" याचा अर्थ, जी स्वतः जमीन कसून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून जमीन कसून घेऊन कापसाचे पीक घेते अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे, परंतु त्यामध्ये, वाणिज्यिक दृष्टीने कापूस बी-बियाण्यांचे प्रापण व विक्री करणाऱ्या व्यक्तीचा समावेश असणार नाही ;

(पाच) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(सहा) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(सात) "उत्पादक" याचा अर्थ, जी कापूस बी-बियाण्यांचे उत्पादन करते किंवा उत्पादन करण्याची व्यवस्था करते अशी व्यक्ती, व्यक्तींचा गट, व्यवसाय-संस्था किंवा कंपनी किंवा संस्था, असा आहे ;

(आठ) "नकली बी-बियाणे" याचा, कापूस बी-बियाण्यांच्या संदर्भात अर्थ, जे बी-बियाणे त्याच्या प्रकारानुसार विशुद्ध किंवा अस्सल नाही ते बी-बियाणे, असा आहे ;

(नऊ) "बी-बियाणे चाचणी संदर्भ प्रयोगशाळा" याचा अर्थ, भारत सरकारने निर्माण केलेली किंवा अधिसूचित म्हणून घोषित केलेली प्रयोगशाळा, असा आहे ;

(दहा) "दुय्यम दर्जाचे बी-बियाणे" याचा अर्थ, कापूस बी-बियाण्यांसाठी विहित केलेल्या मानकांची पूर्ती न करणारे कापूस बी-बियाणे, असा आहे ;

(अकरा) "जनुकीय परिवर्तन केलेला प्रकार" याचा अर्थ, जनुकीय अभियांत्रिकीच्या सहाय्याने जनुकीय रचनेमध्ये सुधारणा किंवा बदल करून कृत्रिमरीत्या तयार केलेले किंवा विकसित केलेले बी-बियाणे किंवा पेरणीची सामग्री, असा आहे ;

(बारा) "प्रकार" याचा अर्थ, माहीत असलेल्या निम्नतम स्तराच्या एका वनस्पतिशास्त्रीय टॅक्सॉनमधील सूक्ष्मजीवाव्यतिरिक्त असलेला वनस्पतींचा गट,—

(क) ज्याची, त्या वनस्पतिगटाच्या दिलेल्या जनुकांच्या प्रकारापासून निर्माण होणारी गुणवैशिष्ट्ये नमूद करून व्याख्या करता येईल ;

(ख) ज्याला, उक्त गुणवैशिष्ट्यांपैकी किमान एखादे गुणवैशिष्ट्य नमूद करून अन्य कोणत्याही वनस्पतिगटापासून वेगळे दर्शविता येईल ; आणि

(ग) ज्याचा, प्रवर्धन करण्याच्या दृष्टीने असलेल्या योग्यतेसंबंधात एक युनिट म्हणून विचार करता येईल व असे प्रवर्धन केल्यानंतर ज्याचे स्वरूप बदलत नाही,—

असा वनस्पतींचा गट, असा आहे आणि त्यामध्ये, अशा प्रकारची प्रवर्धन सामग्री, प्रचलित प्रकार, जनुकीय परिवर्तन केलेला प्रकार, शेतकऱ्यांचा प्रकार आणि सारतः साध्य केलेला प्रकार यांचा समावेश होतो.

(२) यात वापरलेल्या, परंतु व्याख्या न केलेल्या शब्दप्रयोगांचा अर्थ, त्यांना अनुक्रमे बी-बियाणे अधिनियम, १९६६ ; अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ ; त्याखाली काढलेला बी-बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ यांमध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच असेल. १९६६ चा ५४. १९५५ चा १०. १९८६ चा २९.

नियंत्रकाची नियुक्ती. **३.** राज्य शासनाला, विहित करण्यात येईल अशी अर्हता असणाऱ्या अधिकाऱ्याची, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियंत्रक म्हणून नियुक्ती करता येईल.

नियंत्रकाचे अधिकार. **४.** (१) जर नियंत्रकास कापूस बी-बियाण्यांच्या पुरवठ्याचे किंवा वितरणाचे किंवा विक्रीचे विनियमन करण्याच्या दृष्टीने अथवा ते कायम ठेवण्याच्या दृष्टीने अथवा त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट वाटले तर, त्याला, राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीन राहून, लेखी आदेशाद्वारे,—

(एक) कापूस बी-बियाण्यांचा साठा बाळगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, तो संपूर्ण साठा किंवा त्याचा विनिर्दिष्ट भाग, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करून वेळोवेळी निश्चित करील अशा किमतींना आणि अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत, अशा व्यक्तींना, विकण्यास फर्मावता येईल ;

(दोन) कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण व विक्री करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, तिने विक्री वा वितरण करावयाचे कापूस बी-बियाण्यांचे प्रकार, त्यांचा दर्जा किंवा प्रमाण यांबाबत अधिसूचनेमध्ये जे निदेश विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या निदेशांचे पालन करण्यास फर्मावता येईल.

(२) नियंत्रक, उत्पादन-नामाचा गैरवापर केलेल्या (मिसब्रॅन्डेड) किंवा नकली किंवा दुय्यम दर्जाच्या बी-बियाण्यांच्या विक्रीकरिता देय असणारी नुकसानभरपाईची रक्कम, विहित करण्यात येईल अशा रीतीने निर्धारित करील.

(३) ज्या व्यक्तीला पोट-कलम (१) अन्वये आदेश देण्यात आला असेल अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही करारामध्ये वा संलेखामध्ये त्या आदेशाशी विसंगत असे काहीही असले तरी त्या आदेशाचे पालन करील.

नियंत्रकाची कार्ये. **५.** (१) नियंत्रक, राज्यातील कापूस बी-बियाण्यांचा व्यापार करणाऱ्या व्यक्तींची नोंदणी करील आणि शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची रक्कम देण्याची आवश्यक ती व्यवस्था करील.

(२) नियंत्रक पुढील बाबतीत राज्य शासनास सल्ला देईल :—

(एक) डीएनए फिंगरप्रिंटिंग चाचणी किंवा जनुकीयदृष्ट्या शुद्ध बीज चाचणी सक्तीची करून त्याद्वारे कापूस बी-बियाण्यांच्या विक्रीचे नियमन करणे ;

(दोन) शासनाने त्याच्याकडे सल्ल्यासाठी पाठविलेली अन्य कोणतीही बाब.

(३) बी-बियाणे निरीक्षक, बी-बियाणे विश्लेषक आणि राज्य शासन आदेशाद्वारे निदेश देईल असे अन्य अधिकारी नियंत्रकास त्याची कार्ये पार पाडताना सहाय्य करतील.

राज्य बी-बियाणे चाचणी प्रयोगशाळा. **६.** राज्य शासनाला, नियंत्रकाशी विचारविनिमय केल्यानंतर आणि **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून,—

(एक) कापूस बी-बियाण्यांचे विश्लेषण करण्याच्या प्रयोजनासाठी एक किंवा अधिक राज्य बी-बियाणे चाचणी प्रयोगशाळा निर्माण करता येतील अथवा

शासकीय वा अशासकीय क्षेत्रातील कोणतीही बी-बियाणे चाचणी प्रयोगशाळा ही राज्य बी-बियाणे चाचणी प्रयोगशाळा म्हणून घोषित करता येईल ;

(दोन) संदर्भित विश्लेषण करण्यासाठी एका किंवा अधिक बी-बियाणे चाचणी प्रयोगशाळांना बी-बियाणे चाचणी संदर्भ प्रयोगशाळा म्हणून मान्यता देता येईल.

बी-बियाणे निरीक्षक.

**७.** (१) राज्य शासनास, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून, विहित अर्हता असणाऱ्या व्यक्तींची बी-बियाणे निरीक्षक म्हणून नियुक्ती करता येईल आणि ज्या स्थानिक क्षेत्रात त्या त्यांच्या अधिकारितेचा वापर करतील ती क्षेत्रे विनिर्दिष्ट करता येतील.

(२) कापूस बी-बियाण्यांच्या व्यापाराशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, नियंत्रकाने दिलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केलेले आहे अथवा अशा व्यक्तीने पुरवठा केलेल्या कापूस बी-बियाण्यांचा दर्जा संशयास्पद आहे, अथवा कापूस बी-बियाण्यांच्या संबंधात कोणतीही व्यक्ती अपराध करणार आहे असे बी-बियाणे निरीक्षकास सकारण वाटत असेल तर, तो, त्या कोणत्याही जागेत प्रवेश करील, तिची झडती घेईल आणि तेथील नमुने गोळा करील व कापूस बी-बियाण्यांचा साठा व अभिलेख अटकावून ठेवील किंवा जप्त करील आणि बी-बियाणे विश्लेषकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, या अधिनियमामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पुढील सर्व कार्यवाही करील.

(३) जेव्हा बी-बियाणे निरीक्षक बी-बियाण्यांचा नमुना घेईल तेव्हा तो, त्या बी-बियाण्यांचा एक नमुना विश्लेषणाकरिता बी-बियाणे विश्लेषकाकडे पाठवील आणि त्याचा दुसरा मोहोरबंद नमुना, जिच्याकडून तो घेतला होता त्या व्यक्तीकडे विहित रीतीने सुपूर्द करील.

बी-बियाणे विश्लेषक.

**८.** राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विहित अर्हता असणाऱ्या व्यक्तींची बी-बियाणे विश्लेषक म्हणून नियुक्ती करता येईल आणि ज्या स्थानिक क्षेत्रांत त्या त्यांच्या अधिकारितेचा वापर करतील ती क्षेत्रे विनिर्दिष्ट करता येतील.

बी-बियाणे विश्लेषकाचा अहवाल.

**९.** (१) बी-बियाणे विश्लेषक, बी-बियाणे निरीक्षकाकडून नमुना प्राप्त झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य बी-बियाणे प्रयोगशाळेमध्ये त्या नमुन्याचे विश्लेषण करील आणि बी-बियाणे निरीक्षकाला विश्लेषणाच्या निष्कर्षांचा अहवाल सादर करील.

(२) बी-बियाणे निरीक्षकाने विश्लेषणासाठी नमुना पाठविलेली प्रयोगशाळा, तिला नमुना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित बी-बियाणे निरीक्षकाला विश्लेषण अहवाल पाठवील.

(३) बी-बियाणे निरीक्षकास, पोट-कलम (१) खालील बी-बियाणे विश्लेषकाच्या अहवालाच्या आधारे, उक्त बी-बियाणे उत्पादकावर किंवा, यथास्थिति, विक्रेत्यावर खटला दाखल करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू करता येईल.

(४) या अधिनियमाअन्वये खटला दाखल केल्यानंतर, आरोपी विक्रेत्यास किंवा, यथास्थिति, तक्रारदारास विहित फी भरून, बी-बियाणे निरीक्षकाकडे किंवा विक्रेत्याकडे ठेवलेला कोणताही नमुना, या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये विहित करण्यात आलेल्या कोणत्याही बी-बियाणे चाचणी संदर्भ प्रयोगशाळेकडे

विश्लेषणासाठी पाठविण्याकरिता न्यायालयाकडे अर्ज करता येईल. न्यायालय प्रथम त्या नमुन्याचे चिन्ह वा मुद्रा किंवा बांधणी या गोष्टी विहित करण्यात आल्याप्रमाणे जशाच्या तशा आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घेईल. अर्ज प्राप्त झाल्यानंतर, न्यायालयास, स्वतःच्या मुद्रेनिशी तो नमुना, त्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बी-बियाणे चाचणी संदर्भ प्रयोगशाळेकडे पाठविता येईल. त्यानंतर ती प्रयोगशाळा, नमुना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत, विहित नमुन्यात न्यायालयाकडे तिचा अहवाल पाठवील.

(५) पोट-कलम (४) अन्वये बी-बियाणे चाचणी संदर्भ प्रयोगशाळेने पाठविलेला अहवाल, पोट-कलम (१) अन्वये बी-बियाणे विश्लेषकाने दिलेला अहवाल अधिक्रमित करील.

कमाल विक्री किंमत निश्चित करणे.

**१०.** (१) शासनास, उत्पादनाचा खर्च इत्यादी, तसेच जेथे आवश्यक असेल तेथे विविध संबंधित अभिकरणांकडून प्राप्त केलेले विशेष मूल्य, या बाबी विचारात घेऊन नंतर, वेळोवेळी, कापूस बी-बियाण्यांच्या सर्व प्रकारांची कमाल विक्री किंमत निश्चित करता येईल.

(२) अशी प्रत्येक किंमत **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल आणि त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून ती अंमलात येईल.

विक्रेत्यासाठी लायसन.

**११.** (१) कापूस बी-बियाण्यांच्या विक्रीचा व्यवसाय करण्याची इच्छा असणारी प्रत्येक व्यक्ती, लायसन मिळण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, नियंत्रकाकडे अर्ज करील.

(२) अशा अर्जासोबत विहित करण्यात येईल अशी फी व अशी इतर कागदपत्रे जोडण्यात येतील.

(३) नियंत्रक, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, एकतर अर्ज स्वीकारील किंवा तो नाकारील.

(४) जर नियंत्रकाने अर्ज स्वीकारला तर तो, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर आणि अशा नमुन्यात कापूस बी-बियाण्यांच्या विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी लायसन देईल.

उत्पादन-नामाच्या गैरवापरास प्रतिबंध करणे.

**१२.** (१) कोणतीही व्यक्ती, उत्पादन-नामाचा गैरवापर केलेल्या कोणत्याही कापूस बी-बियाण्यांची विक्री करणार नाही किंवा विक्रीसाठी ताब्यात ठेवणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, पुढील बी-बियाणे हे, उत्पादन-नामाचा गैरवापर केलेले कापूस बी-बियाणे असल्याचे मानण्यात येईल, जर,—

(क) एखादे बी-बियाणे हे, ज्या नावाने दुसऱ्या प्रकारचे बी-बियाणे विकले जात असेल त्या नावावर फसवणूक करता येईल अशा रीतीने त्याच्याऐवजी असलेले किंवा त्याच्यासारखे दिसणारे असे असेल आणि त्याचे खरे स्वरूप कळू नये म्हणून त्यावर स्पष्ट व ठळक लेबल लावलेले नसेल ;

(ख) ते कोणत्याही ठिकाणचे किंवा देशाचे उत्पादन असल्याचे खोटे नमूद केले असेल ;

(ग) बी-बियाण्यांच्या दुसऱ्या जातीच्या वा प्रकाराच्या नावाने ते विकले जात असेल ;

(घ) त्याच्यावरील लेबलमध्ये किंवा अन्यथा त्याच्याबाबतीत खोटे दावे केलेले असतील ;

(ङ) एखाद्या विक्रेत्याने किंवा त्याच्या सांगण्यावरून सीलबंद केलेल्या किंवा तयार केलेल्या पुडक्यामधून त्याची विक्री करण्यात येत असेल व त्या पुडक्यावर त्या विक्रेत्याचे नाव व पत्ता नमूद केलेला असेल त्या बाबतीत, या अधिनियमाअन्वये विहित केलेल्या फेरबदलांच्या मर्यादांना अधीन राहून, त्या पुडक्यावर प्रत्येक पुडक्यामध्ये असलेल्या मालाबाबत ठळकपणे अचूक माहिती नोंदविलेली नसेल ;

(च) बी-बियाणे भरलेल्या पुडक्यावर किंवा त्या पुडक्यावर असलेल्या लेबलवर, पुड़क्यातील कापूस बी-बियाण्यांच्या संबंधात कोणतेही वर्णन, चित्र किंवा साधन असेल आणि ते कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती देत असेल अथवा ते पुडके त्यातील मालाच्या बाबतीत अन्यथा फसवणूक करणारे असे असेल ;

(छ) त्याची या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये आवश्यक असलेल्या रीतीने नोंदणी करण्यात आलेली नसेल ;

(ज) पुडक्यातील मालाच्या बाबतीत जो सावधगिरीचा इशारा वा सूचना देणे आवश्यक असेल आणि त्याचे पालन केल्यास माणसे किंवा प्राणी यांच्या बाबतीत निर्माण होऊ शकणारा धोका टाळण्याच्या दृष्टीने ते पुरेसे असेल असा इशारा वा सूचना त्याच्या लेबलवर नसेल ;

(झ) बी-बियाणे भरलेल्या पुडक्यावर किंवा त्याच्या लेबलवर त्या जातीच्या किंवा प्रकाराच्या बी-बियाण्यांचा विक्रेता म्हणून एखाद्या कपोलकल्पित व्यक्तीचे किंवा कंपनीचे नाव असेल; किंवा

(ञ) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या आवश्यकतांनुसार त्यावर लेबल लावलेले नसेल.

१३. (१) कलम ४ अन्वये नियंत्रकाने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस अथवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल. शास्ती.

(२) जी व्यक्ती, उत्पादन-नामाचा गैरवापर केलेल्या किंवा नकली किंवा दुय्यम दर्जाच्या बी-बियाण्यांची विक्री म्हणून मानता येईल अशी कोणतीही कृती करीत असेल तर ती कोणतीही व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस अथवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(३) कलम १० अन्वये निश्चित करण्यात आलेल्या कमाल किंमतीपेक्षा अधिक किंमतीला कापूस बी-बियाण्यांची विक्री करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती, पाच हजार

रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**१४.** (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्या बाबतीत असा अपराध घडला त्यावेळी जिच्याकडे कंपनीचा प्रभार होता किंवा जी कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीस जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनीदेखील, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वतोपरी प्रयत्न केले होते असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी व्यक्ती, या अधिनियमाअन्वये कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमाखालील एखादा अपराध केला असेल, आणि तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्यांनी कानाडोळा केल्यामुळे किंवा दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, निगम निकाय असा आहे व त्यात भागीदारी संस्थेचा, व्यक्तींच्या संघाचा अथवा व्यक्तींच्या संस्थेचा—मग ती विधीसंस्थापित असो वा नसो समावेश होतो ;

(ख) भागीदारी संस्थेच्या संदर्भात "संचालक" याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे आणि व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींची संस्था यांच्या संदर्भात "संचालक" याचा अर्थ, तिच्या कामकाजाचे नियंत्रण करणारा कोणताही सदस्य, असा आहे.

अपराधांची दखल.

**१५.** नियंत्रकाने किंवा त्याने या प्रयोजनाकरिता प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याने लेखी तक्रार केली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, कोणतेही न्यायालय, या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेणार नाही.

सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

**१६.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींअनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, कोणताही प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही वाद, खटला अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

अधिकारी लोकसेवक असणे.

**१७.** नियंत्रक, प्रत्येक बी-बियाणे निरीक्षक, प्रत्येक बी-बियाणे विश्लेषक आणि नियंत्रक, बी-बियाणे निरीक्षक, बी-बियाणे विश्लेषक यांना या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार सहाय्य करणारी इतर प्रत्येक व्यक्ती ही, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. (१८६० चा ४५.)

**१८.** (१) कलम ४ किंवा कलम ५ खालील नियंत्रकाच्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिला असा आदेश कळविल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, आणि विहित करण्यात येईल अशी फी भरून, कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अपील दाखल करता येईल : अपील.

परंतु, अर्जदारास अपील वेळेत दाखल करण्यास पुरेशा कारणाने प्रतिबंध झाला होता अशी त्या अपील प्राधिकरणाची खात्री पटल्यास त्याला उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर अपील विचारार्थ घेता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अपील प्राप्त झाल्यावर, अपील प्राधिकरण, अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन, शक्य तितक्या शीघ्रतेने अपील निकालात काढील.

(३) अपील प्राधिकरणाचा या कलमाखालील प्रत्येक आदेश अंतिम असेल.

**१९.** जेव्हा एखाद्या व्यक्तीस या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करण्याकरिता या अधिनियमान्वये दोषसिद्ध ठरवण्यात आले असेल तेव्हा, ज्या कापूस बी-बियाण्यांच्या संबंधात उल्लंघन झाले असेल ते कापूस बी-बियाणे शासनाकडे जमा करण्यात येईल. मालमत्ता सरकारजमा करणे.

**२०.** शासनास, नियंत्रक, बी-बियाणे निरीक्षक व बी-बियाणे विश्लेषक यांना, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील. निदेश देण्याचा अधिकार.

**२१.** शेतकऱ्याने स्वतः उत्पादन केलेल्या आणि दुसऱ्या एखाद्या शेतकऱ्याने पेरणी करण्यासाठी वापर करावा म्हणून त्याने स्वतःच थेट त्या दुसऱ्या शेतकऱ्याला विक्री केलेल्या कोणत्याही कापूस बी-बियाण्यांना या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. सूट.

**२२.** (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही

सभागृहांचे एकमत झाले आणि अशा आशयाचा त्यांचा निर्णय त्यांनी **राजपत्रात** अधिसूचित केला तर तो नियम, अशा निर्णयाच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरफार केल्यामुळे किंवा तो नियम रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२३.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, प्रसंगपरत्वे, ती अडचण दूर करण्याच्या दृष्टीने त्यास जी गोष्ट करणे आवश्यक किंवा इष्ट वाटेल आणि जी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ यांचे निरसन व व्यावृत्ती.

**२४.** (१) महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अध्यादेश, २००९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००९ चा महा. अध्या. ६.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये, करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक २६ ] शुक्रवार, जुलै ३, २००९/आषाढ १२, शके १९३१ [ पृष्ठे ९, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक ५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Act, 2009 (Mah. Act No. XIX of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XIX OF 2009.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 3rd July 2009).*

An Act to regulate the supply, distribution, sale and fixation of sale price of cotton seeds and for the matters connected therewith or incidental thereto.

54 of 1966. WHEREAS cotton seeds of certain varieties are not notified under section 5 and consequently no sale of such seeds are regulated under section 7 of the Seeds Act, 1966;

10 of 1955. 54 of 2006. AND WHEREAS cotton seed is not an essential commodity within the meaning of the Essential Commodities Act, 1955 as amended by the Essential Commodities (Amendment) Act, 2006;

AND WHEREAS the provisions of the Seeds (Control) Order, 1983 issued under section 3 of the Essential Commodities Act, 1955 are not applicable in so far as they relate to the cotton seeds; 10 of 1955.

AND WHEREAS there is no provision in the Environment (Protection) Act, 1986 to regulate the supply, distribution and sale of transgenic and genetically modified cotton seed and to control the sale price of such cotton seed in the State; 29 of 1986.

AND WHEREAS the traders in cotton seed including transgenic cotton seed were exploiting poor farmers by collecting exorbitant prices;

AND WHEREAS a *Khariff* season was to commence very soon, it had become imperative on the part of the State to regulate the supply, distribution and sale of cotton seeds by fixing the sale price in the interests of the farmers in the State;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to regulate the supply, distribution, sale and fixation of sale price of cotton seeds and for the matters connected therewith or incidental thereto, for the purposes hereinafter appearing ; and therefore, promulgated the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Ordinance, 2009, on the 9th May 2009 ; Mah. Ord. VI of 2009.

AND WHEREAS it is expendient to replace the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Ordinance, 2009 by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixtieth Year of the Republic of India as follows :— Mah. Ord. VI of 2009.

Short title and commencement.

**1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Act, 2009.

*(2)* It shall be deemed to have come into force on the 9th May 2009.

Definitions.

**2.** *(1)* In this Act, unless the context otherwise requires,—

(*i*) " Agronomic performance " means distinguishable agronomic qualitative and quantitative characteristics of any cotton seed variety considered for evaluation of performance as claimed by the producer ;

(*ii*) " Controller " means the Cotton Seed Controller appointed by the Government under section 3;

(*iii*) " cotton seed " means cotton seed of any variety and includes transgenic and genetically modified cotton seed varieties used for sowing ;

(*iv*) " farmer " means any person who raises cotton crops either by cultivating the land by himself or through any other person but shall not include a person engaged in the commercial procurement and sale of cotton seeds ;

(*v*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*vi*) " prescribed " means prescribed by rules made under this Act ;

(*vii*) "producer" means a person, group of persons, firm or company or organisation who grows or organizes the production of cotton seed ;

(*viii*) "spurious seed", in relation to the cotton seed, means that seed which is not genuine or true to its type ;

(*ix*) "Referral Seed Testing Laboratory" means a laboratory established or declared as notified by the Government of India ;

(*x*) "substandard seed" means cotton seed which does not meet the prescribed seed standards for the cotton seed ;

(*xi*) "transgenic variety" means seed or planting material synthesized or developed by modifying or altering the genetic composition by means of genetic engineering ;

(*xii*) "variety" means a plant grouping except micro-organism within a single botanical taxon of the lowest known rank, which can be,—

(*a*) defined by the expression of the characteristics resulting from a given genotype of that plant grouping ;

(*b*) distinguished from any other plant grouping by expression of atleast one of the said characteristics ; and

(*c*) considered as a unit with regard to its suitability for being propagated, which remains unchanged after such propagation,

and includes propagating material of such variety, extant variety, transgenic variety, farmers variety and essentially derived variety.

(*2*) Words and expressions used but not defined herein shall have the meanings respectively assigned to them in the Seeds Act, 1966, the Essential Commodities Act, 1955, the Seeds (Control) Order, 1983 and the Environment (Protection) Act, 1986.

54 of 1966. 10 of 1955. 29 of 1986.

Appointment of Controller.

**3.** The State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint an officer, possessing such qualifications as may be prescribed, to be the Controller.

Powers of Controller.

**4.** (*1*) Subject to the control of the State Government, the Controller, if it appears to him to be necessary or expedient for regulating, maintaining or increasing the supply or distribution or sale of cotton seeds, may, by order in writing, require any person,—

(*i*) holding stock of cotton seed, to sell the whole or specified part thereof at such prices as may be fixed by the State Government, by publication of notification in the *Official Gazette*, from time to time, and to such persons in such circumstances as may be specified in the notification ;

(*ii*) engaged in the supply, distribution and sale of cotton seeds, to comply with the directions, as may be specified in the notification, as to the variety, quality or quantity of the cotton seeds to be sold or delivered by him.

(2) The Controller shall determine the compensation payable for sale of misbranded or spurious or substandard seed, in such manner, as may be prescribed.

(3) Notwithstanding anything contained in any contract or instrument to the contrary, every person to whom an order is issued under sub-section (*1*) shall comply with such order.

Functions of Controller.

**5.** (*1*) The Controller shall register the persons engaged in the trade of cotton seeds in the State and make necessary arrangements for payment of compensation to farmers.

(2) The Controller shall advice the State Government on the following matters, namely :—

(*i*) regulation of sale of cotton seed by way of compulsory DNA fingerprinting test or genetic purity test ;

(*ii*) any other matter referred to him for advice by the Government.

(3) In the discharge of its functions, the Controller shall be assisted by the Seed Inspectors, Seed Analysts and such other officers as the State Government may, by order, direct.

State Seed Testing Laboratory.

**6.** The State Government may, after consultation with the Controller and by publication of notification in the *Official Gazette*,—

(*i*) for the purpose of carrying out analysis of cotton seed, establish one or more State Seed Testing Laboratories or declare any seed testing laboratory in the Government or non-Government sector as a State Seed Testing Laboratory ;

(*ii*) for the purpose of referral analysis, may recognize one or more seed testing laboratories as Referral Seed Testing Laboratories.

Seed Inspector.

**7.** (*1*) The State Government may, by publication of notification in the *Official Gazette*, appoint persons possessing the prescribed qualifications, to be the Seed Inspectors and specify the local areas within which they shall exercise jurisdiction.

(2) The Seed Inspector, if he has reason to believe that any person dealing in trade of cotton seed has contravened any of the directions issued by the Controller, or that the quality of the cotton seed supplied by such person is of suspicious nature or that any person is about to commit an offence in respect of cotton seed, shall enter and search any premises and draw samples and detain or seize the stock of cotton seed and records and after receiving the report of Seed Analyst, shall take all further action as specified in this Act.

(3) When a sample has been taken by the Seed Inspector, he shall forward one seed sample to the Seed Analyst for analysis and hand over another sealed sample, in the prescribed manner, to the person from whom it was taken.

8. The State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint persons, possessing the prescribed qualifications, to be the Seed Analysts and specify the local areas within which they shall exercise their jurisdiction. Seed Analysts.

9. (*1*) The Seed Analyst shall, as soon as may be, after the receipt of the sample from the Seed Inspector, analyse the sample at the State Seed Testing Laboratory and furnish a report on the result of the analysis to the Seed Inspector. Report of Seed Analyst.

(*2*) The Laboratory to which a sample has been sent by a Seed Inspector for analysis shall send the analysis report to the concerned Seed Inspector within thirty days from the date of receipt of the sample to the Laboratory.

(*3*) The Seed Inspector may, on the basis of the report of the Seed Analyst under sub-section (*1*), institute proceedings for the prosecution of the producer or vendor, as the case may be, of the said seed.

(*4*) After institution of prosecution under this Act, the accused vendor or the complainant, as the case may be, on payment of the prescribed fee, may make an application to the Court, for sending any of the sample retained with the Seed Inspector or vendor to any of the Referral Seed Testing Laboratory prescribed under section 6 of the Act, for the analysis. The Court shall first ascertain that the mark or seal or fastening, as prescribed is intact. On receipt of the application, the Court may dispatch the sample under its own seal to any of the Referral Seed Testing Laboratory specified for the purpose, which shall, thereupon, within a period of thirty days from the date of receipt of sample, send its report to the Court, in the prescribed form.

(*5*) The report sent by the Referral Seed Testing Laboratory under sub-section (*4*) shall supersede the report given by the Seed Analyst under sub-section (*1*).

**10.** (*1*) The Government, after taking into consideration the costs of production, etc., including trait value, wherever necessary, obtained from various agencies concerned, may fix, from time to time, the maximum sale price of all types of cotton seeds. **Fixation of maximum sale price.**

(*2*) Every such price shall be published in the *Official Gazette* and shall be effective from such date as may be specified therein.

**11.** (*1*) Every person desirous of conducting the business of sale in cotton seeds shall apply to the Controller for grant of licence in such form as may be prescribed. **License for vendor.**

(*2*) Such application shall be accompanied by such fees and such other documents as may be prescribed.

(*3*) The Controller shall, after making such enquiry as he deems fit, either allow the application or reject it.

(*4*) If the Controller allows the application, he shall grant the licence to conduct the business of sale in cotton seeds, on such terms and conditions and in such form as may be prescribed.

Prohibition of misbranding.

**12.** (*1*) No person shall sale or keep in his possession for sale, any cotton seed which is misbranded.

(*2*) For the purposes of sub-section (*1*), cotton seed shall be deemed to be misbranded, if,—

(*a*) it is a substitute for, or resembles in a manner likely to deceive another variety of seed under the name of which it is sold, and is not plainly and conspicuously labelled so as to indicate its true nature ;

(*b*) it is falsely stated to be the produce of any place or country ;

(*c*) it is sold by a name which belongs to another kind or variety of seed ;

(*d*) false claims are made for it upon the label or otherwise ;

(*e*) it is sold in a package which has been sealed or prepared by or at the instance of the dealer and which bears his name and address, the contents of each package are not conspicuously and correctly stated on the outside thereof within the limits of variability prescribed under this Act ;

(*f*) the package containing it or the label on the package bears any statement, design or device regarding the quality of cotton seed contained therein, which is false or misleading in any material particular or if the package is otherwise deceptive with respect of its contents ;

(*g*) it is not registered in the manner required by or under this Act ;

(*h*) its label does not contain a warning or caution which may be necessary and sufficient, if complied with, to prevent risk to human beings or animals ;

(*i*) the package containing it or the label on the package bears the name of a fictitious individual or company as the dealer of the kind or variety ; or

(*j*) the package is not labelled in accordance with the requirements of this Act or rules made thereunder.

Penalties.

**13.** (*1*) Any person who contravenes any order issued to him by the Controller under section 4, shall be punishable with imprisonment for a term which may extend to three years or with fine which may extend to rupees five thousand or with both.

(*2*) If any person commits any act amounting to sale of misbranding, or of spurious or of substandard seed, then he shall be punishable with imprisonment for a term which may extend to three years or with fine which may extend to rupees five thousand or with both.

(*3*) Any person who sells the cotton seed at the price in excess of the maximum price fixed under section 10 shall be punishable with a fine which shall not be less than five thousand rupees but which may extend to ten thousand rupees.

**14.** (*1*) Where an offence under this Act has been committed by a company, every person who, at the time the offence was committed, was in charge of, or was responsible to, the company for the conduct of the business of the company, as well as the company, shall be deemed to be guilty of the offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly : Offences by companies.

Provided that, nothing contained in this sub-section shall render any such person liable to any punishment under this Act, if he proves that the offence was committed without his knowledge or that he has exercised all due diligence to prevent the commission of such offence.

(*2*) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), where an offence under this Act has been committed by a company and it is proved that the offence has been committed with the consent or connivance of, or is attributable to any neglect on the part of any director, manager, secretary or other officer of the company, such director, manager, secretary or other officer shall also be deemed to be guilty of that offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly.

*Explanation.*—For the purposes of this section,—

(*a*) " company " means a body corporate and includes a firm, association of persons or body of individuals whether incorporated or not ;

(*b*) " director ", in relation to firm, means a partner in the firm, and in relation to any association of persons or body of individuals, means any member controlling the affairs thereof.

**15.** No Court shall take cognizance of an offence punishable under this Act except upon a complaint, in writing, made by the Controller or any other officer authorised by him for this purpose. Cognizance of offences.

**16.** No suit, prosecution or other legal proceedings shall lie against any authority or person for anything done or purported to have been done in good faith in pursuance of the provisions of this Act or the rules made thereunder. Protection of action taken in good faith.

**17.** The Controller, every Seed Inspector, every Seed Analyst and every other person assisting the Controller, Seed Inspector or Seed Analyst, in pursuance of the provisions of this Act shall be deemed to be a public servant within the meaning of section 21 of the Indian Penal Code. Officers to be public servants.

45 of 1860.

Appeals.

**18.** (*1*) Any person aggrieved by a decision of the Controller under section 4 or section 5 may, within thirty days from the date on which the decision is communicated to him and on payment of such fees as may be prescribed, prefer an appeal to the Commissioner, Agriculture, Maharashtra State :

Provided that, the appellate authority may entertain an appeal after the expiry of the said period of thirty days, if it is satisfied that the appellant was prevented by sufficient cause from filing the appeal in time.

(*2*) On receipt of an appeal under sub-section (*1*), the appellate authority shall, after giving the appellant an opportunity of being heard, dispose of the appeal as expeditiously as possible.

(*3*) Every order of the appellate authority under this section shall be final.

Forfeiture of property.

**19.** Where any person has been convicted under this Act for the contravention of any of the provisions of this Act or the rules made thereunder, the cotton seed in respect of which the contravention has been committed may be forfeited to the Government.

Power to give directions.

**20.** The Government may give such directions to the Controller, Seed Inspector and Seed Analyst as may appear to it to be necessary for carrying into execution in the State any of the provisions of this Act or of any rules made thereunder.

Exemption.

**21.** Nothing in this Act shall apply to any cotton seed grown by a farmer and sold or delivered by him on his own premises directly to another farmer for being used by that farmer for the purpose of sowing.

Power to make rules.

**22.** (*1*) The State Government may, by notification in the *Official Gazette,* and subject to the condition of previous publication, make rules to carry out the purposes of this Act.

(*2*) Every rule made under this Act shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature, while it is in session for a total period of thirty days, which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before the expiry of the session in which it is so laid or the session immediately following, both Houses agree in making any modification in the rule or both Houses agree that the rule should not be made, and notify their decision to that effect in the *Official Gazette,* the rule shall, from the date of publication of such decision in the *Official Gazette*, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so, however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

**23.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of this Act, the Government may, as occasion arises, by an order published in the *Official Gazette*, do anything not inconsistent with the provisions of this Act, which appears to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty : Power to remove difficulty.

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

(*2*) Every order made under this section shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

Mah. Ord. VI of 2009. **24.** (*1*) The Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Ordinance, 2009, is hereby repealed. Repeal of Mah. Ord. VI of 2009 and saving.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक २९] शुक्रवार, जुलै २४, २००९/श्रावण २, शके १९३१ [पृष्ठे १, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ५६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

## *ERRATA*

In the English Translation of the Maharashtra Cotton Seeds (Regulation of supply, distribution, sale and fixation of sale price) Act, 2009 (Mah. XIX of 2009), published in the *Maharashtra Government Gazette,* Extraordinary No. 51, Part VIII, dated the 3rd July 2009, at pages 1–9, on page 2, in line 24, *for* " expendient " *read* " expedient".



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.